MHBU080006232025

दाखल तारीखः– १३/०५/२०२५
नोंदणी तारीखः– १३/०५/२०२५
निर्णय तारीखः– १०/०८/२०२६
कालावधीः– वर्ष महिने दिवस
०१ ०२ २८

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, नांदुरा, जि.बुलढाणा यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी– किरण वि. लुंगे)

**नि.फौ.प्रकरण क्र.७२/२०२५** **निशाणी क्र.२१**

| | | |
|---|---|---|
| **सरकारपक्ष** | : | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, नांदुरा, जि. बुलढाणा. |
| सरकारपक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता | : | **श्री.के.व्ही.गारमोडे साहेब.** |
| | **- विरुध्द -** | |
| **आरोपी** | | **१. पप्पु खान उर्फ शहजादउल्ला खान असदउल्ला खान,**<br>वय – २६ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>**२. अब्दुल रजा अब्दुल अनीस,**<br>वय – २६ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>**३. इरफान शाह उस्मान शाह,**<br>वय – २६ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>सर्व रा. वडनेर भोलजी, ता. नांदुरा, जि.बुलढाणा. |
| आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ | : | **श्री.वसीम सैय्यद साहेब** |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा तारीख | : | २१/०५/२०२४ |
| छापील प्रथम खबर तारीख | : | २१/०५/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | १३/०५/२०२५ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | : | २७/०७/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | २७/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | १०/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १०/०८/२०२६ |
| शिक्षेची तारीख, लागु असल्यास | : | –– |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | दोषारोप ठेवण्यात आलेले कलम | निर्दोष मुक्त किंवा शिक्षा कसे | ठोठावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं.च्या कलम ४२८ च्या अन्वये खटल्याच्या दरम्यानचा तुरुंगवासात काढलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पप्पु खान उर्फ शहजादउल्ला खान असदउल्ला खान | २२/०५/२०२४ | २४/०५/२०२४ | ३७९, ५११, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ भा.दं.वि प्रमाणे | निर्दोष मुक्त | –– | –– |
| २ | अब्दुल रजा अब्दुल अनीस | | | | | | |
| ३ | इरफान शाह उस्मान शाह | | | | | | |

**सरकारपक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. सरकार पक्ष**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | मोहम्मद इरफान मोहम्मद मुतकीनद्दीन | फिर्यादी (नि.क्र.१९) |

**ब.बचाव पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**सरकार पक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन निशाणी क्रमांक**

**अ.सरकारपक्षः–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | २० | फिर्याद वरील फिर्यादीची सही |
| २ | २१ | छापील प्रथम खबर वरील फिर्यादीची सही |

**ब.बचावपक्षः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क.न्यायालयीन निशाणीः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**ड.वस्तुः–**

| अ.क्र. | वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**न्यायनिर्णय**

(पारीत दिनांक १०/०८/२०२६)

आरोपी हे भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे भा.दं.वि असे संबोधण्यात येईल) चे कलम ३७९, ५११, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयाच्या खटल्यास सामोरे जात आहेत.

**<u>सरकारपक्षाचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे:-</u>**

२) दि.२१/०५/२०२४ रोजी सायंकाळी ०५:०० वाजता मोहम्मद इरफान मोहम्मद मुतकीनद्दीन (यापुढे फिर्यादी म्हणून उल्लेख केला जाईल) हा त्याचे शेतामध्ये म्हशी आणण्याकरीता गेला होता. त्यावेळी, त्याला त्याचे शेतातील विहीरीजवळ आरोपी उभे दिसले

व विहीरीमधील पाण्याची मोटर पाईपच्या सहाय्याने चोरी करण्याच्या उद्देशाने वर ओढत होते. त्यामुळे, फिर्यादीने तेथे जावुन आरोपींना विचारले की, ''तुम्ही माझ्या शेतातील पाण्याची मोटर वर का काढत आहे, तुम्ही माझ्या शेतात काय करत आहे''. त्यावर, आरोपी क्र.१ म्हणाला की, ''आम्ही तुझ्या शेतात सहज फिरत आलो होतो''. त्यानंतर, आरोपी रस्त्यावर उभ्या असलेल्या मोटरसायकलवर बसुन निघुन गेले. त्यानंतर, फिर्यादीने विहीरीजवळ जावुन पाहिले असता शेतातील स्टार्टर मधील वायर कापलेली होती व विहीरीतील मोटरला लावलेला पाईप वर ओढलेला होता. त्यावेळी, फिर्यादीचे लक्षात आले की, आरोपींनी शेतातील विहीरीमधील पाण्याची मोटर चोरी करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर, अंदाजे ०७:०० वाजता फिर्यादी शेतातुन घरी येत असतांन गावातील जि.प.उर्दु शाळेजवळील सार्वजनिक पाण्याच्या हौदाजवळ आरोपी त्याला बसलेले दिसले व आरोपी फिर्यादीकडे आले. आरोपी क्र.१ याने फिर्यादीला शिवीगाळ करुन लोटपाट केली व आरोपी क्र.२ व ३ यांनी धमकी दिली की, ''तु जर कोणाला आमचे नाव सांगीतले तर, तुझे हातपाय तोडुन टाकु''. त्यामुळे, सदर घटनेबाबत फिर्यादीने पो.स्टे. ला फिर्याद दिली.

**३)** सदर फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द गुन्हा क्र.३३२/२०२४ भा.दं.वि. चे कलम ३७९, ५११, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ नुसार नोंदविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपींना अटक केली. तपासाअंती आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३७९, ५११, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अंतर्गत गुन्हयासाठी दोषारोपपत्र दाखल केले.

**४)** मी आरोपींविरुध्द **निशाणी क्र.१३** भा.दं.वि. चे कलम ३७९, ५११, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्ह्याचा दोषारोप निश्चित करून तो त्यांना त्यांचे मातृभाषेत समजावुन सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबूल असल्याचे निवेदन दिल्यामुळे संपरीक्षा घेण्यात आली. आरोपींविरुध्द आरोप सिध्द करण्यासाठी सरकार पक्षातर्फे फिर्यादीची साक्ष नोंदविली. आरोपींचे विरुध्द गुन्हयाच्या संदर्भाने कोणताही पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहीता, १९७३, चे कलम ३१३ (१) (ब) प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**५)** मी दोन्ही पक्षाचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला, तसेच सरकार पक्षातर्फे नोंदविण्यात आलेला साक्षी पुरावा वाचला असता खालील मुद्दे न्यायनिर्णयासाठी उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | सरकारपक्ष सिध्द करतो काय की, दि.२१/०५/२०२४ रोजी १७:०० वा.चे दरम्यान फिर्यादीचे मौजे वडनेर भाग–२ मधील गट क्र.८५१ मधील शेतामध्ये आरोपींनी सामाईक गुन्ह्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या शेतातील पाण्याची मोटर व पाण्याच्या मोटरचे स्टार्टर अप्रामाणिकपणे घेऊन जाण्याच्या उद्देशाने स्थानभ्रष्ट करुन चोरी करण्याचा प्रयत्न केला आणि त्याद्वारे आरोपींनी भा.दं.वि. चे कलम **३७९/५११** सह कलम ३४ नुसार गुन्हा केला? | **नाही.** |
| २. | सरकारपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, संध्याकाळी ०७:०० वा.चे दरम्यान मौजे वडनेर भोलजी येथील जि.प.उर्दु शाळेच्या जवळ आरोपींनी सामाईक गुन्ह्याच्या उद्देशाने फिर्यादीला लोटपाट करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचवली आणि त्याद्वारे आरोपींनी भा.दं.वि. चे कलम **३२३** सह कलम ३४ नुसार गुन्हा केला? | **नाही.** |
| ३. | सरकारपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व स्थळी आरोपींनी सामाईक गुन्ह्याच्या उद्देशाने फिर्यादीचा उद्देशपूर्वक अपमान करून प्रक्षोभित केले आणि प्रक्षोभनामुळे त्याचेकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य अपराध घडावा असा त्यामागे उद्देश ठेवला आणि त्याद्वारे आरोपींनी भा.दं.वि. चे कलम **५०४** सह कलम ३४ नुसार गुन्हा केला? | **नाही.** |
| ४. | सरकारपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व स्थळी आरोपींनी सामाईक गुन्ह्याच्या उद्देशाने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून त्याचे मनात भिती उत्पन्न केली व त्याद्वारे आरोपींनी भा.दं.वि. चे कलम **५०६** सहकलम ३४ नुसार गुन्हा केला? | **नाही.** |
| ५. | आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

६) फिर्यादी व आरोपीने एकत्रित पुरसिस दाखल करुन कळविले की, फिर्यादी व आरोपी हे

एकाच गावचे व समाजाचे असुन भविष्यातील त्यांचे संबंध टिकुन व सलोख्याचे राहावेत करीता त्यांनी न्यायालया बाहेर प्रकरण आपसात समजोता करुन मिटविले आहे. फिर्यादीस सदर प्रकरण पुढे चालविणे नाही. त्यामुळे, सरकार पक्षाचा पुढील पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ बाबत :–</u>**

७) वरील मुद्दे ऐकमेकांशी संलग्न असल्याने, तसेच त्यावरील पुरावा एकच असल्याने त्यांचे विवेचन एकत्रीतरीत्या करण्यात येत आहे.

८) फिर्यादी मोहम्मद इरफान मोहम्मद मुतकीनद्दीन (स.सा.क्र.१) याने पुराव्यात कथन केले कि, तो आरोपींना ओळखतो, ते त्याचे गावचे आहेत. घटना ही अंदाजे दोन वर्षापुर्वी त्याचे शेतात घडली होती. त्यादिवशी, आरोपी त्याला त्याच्या शेतामध्ये दिसले होते. त्यावेळी आरोपींची व त्याची शाब्दीक बाचाबाची झाली होती. त्यानंतर, त्याने रागाच्या भरात पो.स्टे.ला फिर्याद दिली. अभिलेखावर दाखल लेखी फिर्याद व छापील प्रथम खबर वरील सही त्याने ओळखली परंतु मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. त्याने पुढे कथन केले की, ''असे काही घडले नाही की, दि.२१/०५/२०२४ रोजी सायंकाळी ०५:०० वाजता मी शेतात म्हशी आणण्याकरीता गेलो असता मला आरोपी माझ्या शेतातील विहीजवळ उभे दिसले, आरोपी हे विहीरीतुन पाण्याची मोटर वर काढत होते, तेव्हा मी आरोपींना शेतामध्ये काय करत आहे असे विचारले असता आरोपी क्र.१ म्हणाला की, ते सहज फिरायला आले आहे व रस्त्यावर उभ्या असलेल्या मोटरसायलवर निघुन गेले, नंतर मी विहीरीजवळ जावुन पाहिले असता माझ्या शेतातील स्टार्टर मधील वायर कापलेली होती व विहीरीतील मोटरला लावलेला पाईप वर ओढलेला दिसला, त्यामुळे माझे लक्षात आले की, आरोपी हे माझ्या शेतातील विहीरीमधील पाण्याची मोटर चोरी करण्याचा प्रयत्न करीत होते, त्यानंतर गावातील जिल्हा परीषद उर्द शाळेजवळील सार्वजनिक हौदाजवळ आरोपी दिसले व मला बघुन माझ्या जवळ आले व मला बघुन शिवीगाळ केली व लोटपाट केली व मला हातपाय तोड्डुन टाकु अशी धमकी दिली, त्यामुळे मी पो.स्टे.ला फिर्याद दिली''. फिर्यादी हा सरकार पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यास भारतीय साक्षी पुरावा कायदा, १८७२ चे कलम १५४ अन्वये उलटतपासात विचारता येतील असे प्रश्न विचारले. परंतु, फिर्यादीने घटनेबाबत सरकारपक्षाचे कथनाप्रमाणे काहीही साक्ष दिली नाही. तसेच, मान्य केले की, त्याचे आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसी झालेले आहे व त्यास आरोपींविरुध्द पुढे केस चालवायची नाही.

९) फिर्यादीने त्याची लेखी फिर्याद व सरकार पक्षाचे कथनास दुजोरा न दिल्यामुळे फिर्याद सिध्द झाली नाही. फिर्यादी व आरोपी यांचे मध्ये आपसी तडजोड झाल्याबाबत पुरसीस दाखल केली आहे. त्यामुळे, दि.२१/०५/२०२४ रोजी १७:०० वा.चे दरम्यान फिर्यादीचे मौजे वडनेर भाग–२ मधील गट क्र.८५१ मधील शेतामध्ये आरोपींनी सामाईक गुन्ह्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या शेतातील पाण्याची मोटर व पाण्याच्या मोटरचे स्टार्टर अप्रामाणिकपणे घेऊन जाण्याच्या उद्देशाने स्थानभ्रष्ट करुन चोरी करण्याचा प्रयत्न केला, संध्याकाळी ०७:०० वा.चे दरम्यान मौजे वडनेर भोलजी येथील जि.प.उर्दु शाळेच्या जवळ फिर्यादीला लोटपाट करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचवली, फिर्यादीचा उद्देशपूर्वक अपमान करून प्रक्षोभित केले आणि प्रक्षोभनामुळे त्याचेकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य अपराध घडावा असा त्यामागे उद्देश ठेवला व फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून त्याचे मनात भिती उत्पन्न केली याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा सारासार विचार करता सरकार पक्षाचे कथनाप्रमाणे आरोपींनी भा.दं.वि. चे कलम ३७९, ५११, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयासाठी लागणारे आवश्यक घटक कोणताही ठोस पुरावा देवुन सिध्द करू शकलेले नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर **नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.५ बाबत :–</u>**

१०) मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविल्यामुळे आरोपी हे सदर गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये या न्यायनिर्णया विरुध्द सरकार पक्षाने अपील किंवा इतर कार्यवाही केल्यास त्यामध्ये हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपींनी जामीन देणे आवश्यक आहे. तसेच, प्रकरणामध्ये जप्त असलेली एक मोटरसायकल नोंदणी क्र.एमएच–२८–एए–०७७८ ही न्यायालयाचे आदेशान्वये शेख रियाज शेख बिसमिल्ला यांना सुपुर्तनाम्यावर अंतरीम ताब्यात देण्यात आली आहे. त्यामुळे, सुपुर्तनाम्यावरील अंतरिम ताबा कायम करणे आवश्यक आहे. सबब, मुद्दा क्र.५ चे उत्तराकरीता खालील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र.१) **पप्पु खान उर्फ शहजादउल्ला खान असदउल्ला खान**, क्र.२) **अब्दुल रजा अब्दुल अनीस** व क्र.३) **इरफान शाह उस्मान शाह**, यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) च्या तरतुदीनुसार, भा.दं.वि. चे

कलम ३७९, ५११, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ या दंडनिय अपराधातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तिक बंधपत्रे व जामीन कदबे रद्द करण्यात येत आहे.

३. गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक मोटरसायकल नोंदणी क्र. एमएच–२८–एए–०७७८ चा दिलेला अंतरिम ताबा हा कायम करण्यात येत आहे.

४. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ च्या तरतुदीनुसार विद्यमान वरिष्ठ न्यायालयातील अपीलमध्ये किंवा न्यायनिर्णय विरुध्द याचीकेमध्ये नोटीस मिळाल्यावर हजर राहण्याकरीता आरोपींनी पुढील सहा महिन्यापर्यंत कायम राहील असा प्रत्येकी रुपये १०,०००/- (रु.दहा हजार) चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढ्याच रकमेचा जामीन दाखल करावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

LUNGE KIRAN VITTHAL
Digitally signed by LUNGE KIRAN VITTHAL
Date: 2026.08.10 18:07:19 +0530

दिनांक–१०/०८/२०२६
ठिकाण–नांदुरा

(किरण वि. लुंगे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
नांदुरा, जि.बुलडाणा.